# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.08.2024** **वारःशनिवार**

---

1. पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तारित मेट्रो प्रकल्पाला, तसंच ठाणे रिंग मेट्रोला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या राज्यस्तरीय लाभ वितरणाचा आज पुण्यात प्रारंभ
3. 70व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा; 'वाळवी' ठरला सर्वोत्तम मराठी चित्रपट तर 'मर्मर्स ऑफ द जंगल'ला सर्वोत्तम माहितीपटाचा पुरस्कार जाहीर आणि
4. कोलकाता महिला अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ भारतीय वैद्यकीय संघटनेचा आज एक दिवसाचा देशव्यापी संप

**केंद्रीय मंत्रिमंडळ**

देशातील तीन नवीन मेट्रो रेल्वे प्रकल्पांना काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मान्यता दिली. पुण्यातील स्वारगेट ते कात्रज हा विस्तारित प्रकल्प; ठाणे रिंग मेट्रो आणि बंगळूरू मेट्रो प्रकल्पाचा यात समावेश आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ठाणे एकात्मिक रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा अंदाजित खर्च 12 हजार 200 कोटी रुपये असून हा मार्ग नौपाडा, वागळे इस्टेट, डोंगरीपाडा, हिरानंदानी इस्टेट, कोलशेत, साकेत इत्यादी प्रमुख भागांना जोडेल. पुण्यातील स्वारगेट ते कात्रज या भुयारी मार्गाची लांबी साधारण साडे पाच किलोमीटर असून या मार्गावर मार्केट यार्ड, बिबवेवाडी, आणि बालाजी नगर अशी तीन स्थानकं प्रस्तावित आहेत. स्वारगेट ते कात्रज या विस्तारित मार्गाला मंजुरी मिळाल्याने आता पिंपरी चिंचवडपासून कात्रजपर्यंतचा मेट्रो प्रवास शक्य होणार आहे. या मार्गासाठी 2 हजार 954 कोटी रुपये खर्च अपेक्षित असून केंद्र सरकार, राज्य सरकार आणि पुणे महापालिकेचा त्यामध्ये वाटा असेल. स्वारगेट ते कात्रज या नव्या मार्गाचं काम फेब्रुवारी 2029 पर्यंत पूर्ण होणं अपेक्षित आहे. पुण्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा आहे, असं केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे.

**निवडणुका**

केंद्रीय निवडणूक आयोगानं जम्मू आणि काश्मीर तसंच हरियाणा या दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम काल जाहीर केला. जम्मू आणि काश्मीरमध्ये 18 सप्टेंबर, 25 सप्टेंबर आणि 1 ऑक्टोबर अशा तीन टप्प्यात, तर हरियाणामध्ये 1 ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. दोन्ही ठिकाणची मतमोजणी 4 ऑक्टोबर रोजी होईल.

**लाडकी बहीण**

राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या राज्यस्तरीय लाभ वितरणाचा कार्यक्रम आज पुण्यात बालेवाडी इथल्या श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलात होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस, तसंच केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि अन्य मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. राज्यातील 15 हजाराहून अधिक लाभार्थी प्रातिनिधिक स्वरुपात या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

या योजनेंतर्गत पात्र महिलांना दर महिन्याला 1 हजार 500 रुपयांचा लाभ देण्यात येत असून जुलै आणि ऑगस्ट या दोन्ही महिन्यांचे एकत्रित 3 हजार रुपये लाभार्थी भगिनींच्या खात्यावर जमा होण्यास 14 ऑगस्टपासूनच सुरूवात झाली आहे. काल अखेर पुणे जिल्ह्यातील 5 लाखाहून अधिक लाभार्थी महिलांच्या बँक खात्यावर या योजनेची रक्कम जमा झाली आहे.

या योजनेच्या लाभार्थींशी मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्यदिनी दूरस्थ माध्यमातून प्रातिनिधिक स्वरूपात संवाद साधला. कोल्हापूर जिल्ह्यातल्या एक लाभार्थी सरिता कांबळे यांनी याबाबत आकाशवाणीकडे आपलं मनोगत व्यक्त केलं......

दरम्यान पुण्यात आयोजित या कार्यक्रमामुळे बाणेर रस्ता आणि बालेवाडी इथल्या वाहतुकीत बदल करण्यात आला असून अवजड वाहनांना बाणेर रस्त्यावर बंदी घालण्यात आली असल्याची माहिती पुणे वाहतूक विभागानं दिली आहे.

**डिजीटल मार्केटींग ॲप**

राज्यातील महिला बचतगट आणि महिला उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना राष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारीत डिजीटल मार्केटींग ॲप तयार करावं असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत दिले. या संदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. शहरांमध्ये बचतगटांची संख्या वाढवावी; ग्रामीण भागातील बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना शहरांमध्ये बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

**राज्यपाल-रायगड**

कठोर आणि प्रामाणिक मेहनत तसंच सर्वोत्तम सातत्यपूर्ण कामगिरी ही यशाची गुरुकिल्ली आहे असं प्रतिपादन राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती सी.पी. राधाकृष्णन यांनी केलं. रायगडमधील लोणेरे इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या 26व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते.

**चित्रपट पुरस्कार**

70 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. आट्टम या मल्याळी चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. 'ऊँचाई' या चित्रपटासाठी सूरज बडजात्या यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, 'तिरुचित्रमबलम' या चित्रपटासाठी नित्या मेनन आणि 'कच्छ एक्सप्रेस' चित्रपटासाठी मानसी पारेख सर्वोत्कृष्ट अभिनेत्री तर 'कांतारा' या कन्नड चित्रपटासाठी रिषभ शेट्टी याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला. परेश मोकाशी यांनी दिग्दर्शित केलेला वाळवी हा सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट ठरला असून कथाबाह्य चित्रपट विभागात सोहिल वैद्य दिग्दर्शित 'मर्मर्स ऑफ द जंगल' म्हणजेच 'आदीगुंजन' या मराठी माहितीपटानं सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा मान मिळवला आहे. याच माहितीपटासाठी सुमंत शिंदे यांना सर्वोत्कृष्ट निवेदनासाठी पुरस्कार जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट कला-संस्कृतीविषयक चित्रपटाचा मान सचिन सूर्यवंशी यांच्या 'वारसा' या शिवकालीन युद्ध कलेवर आधारित मराठी चित्रपटानं पटकावला. तर 'आणखी एक मोहेंजोदारो' हा सर्वोत्कृष्ट चरित्रात्मक चित्रपट ठरला आहे.

**कोलकाता देशव्यापी संप**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयातील महिला अत्याचाराच्या घटनेनंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ भारतीय वैद्यकीय संघटनेनं आज एक दिवसाचा देशव्यापी संप पुकारला आहे.

भाजपा महिला मोर्चाने काल मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज स्थानकासमोर मेणबत्ती मोर्चा काढत या घटनेबद्दल निषेध व्यक्त केला. हिंगोलीत डॉक्टर हेडगेवार स्मृती रुग्ण सेवा मंडळ आणि दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तर धुळ्यात श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांनी ठिय्या आंदोलन सुरू केलं आहे.

**बांगलादेश**

बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदुंवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ नाशिकमध्ये सकल हिंदु समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या नाशिक बंदला काल संमिश्र प्रतिसाद मिळाला. दवाखाने, रूग्णालये, शासकीय कार्यालये आणि औषधांची दुकाने वगळता बहुतांश बाजारपेठेतील दुकाने बंद होती. जुन्या नाशिक भागात बंदचे आवाहन करताना या आंदोलनात तणाव निर्माण झाला होता. संध्याकाळी पोलीसांनी जमाव बंदीची घोषणा केल्यानंतर तणाव काहीसा निवळला. जळगावमध्येही निषेध मोर्चा दरम्यान काही आंदोलकांनी एका दुकानाची तोडफोड केली. त्यानंतर पोलीसांनी सौम्य लाठीमार केला. नंदुरबार शहरासह, शहादा, धडगावमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. धुळे जिल्ह्यात आज बंद पुकारण्यात आला असून नागरिकांनी कायदा सुव्यवस्था अबाधित राखावी असं आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी केलं आहे.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.